MHAH180011102013

## नियमित दिवाणी दावा क्र. ३७५/२०१३ मधील आदेश नि.क्र. ८५

## ठकुबाई पांडुरंग पिलगर व इतर वि. रामभाऊ तुकाराम कानडे व इतर ४

१. प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादीविरुध्द जाहीर ठरावासाठी व कब्जासाठी दाखल केलेला आहे. सदर वादीच्या म्हणण्याप्रमाणे वादीने मयत गहीनाजी कोंडाजी चांभार यांनी प्रतिवादी रामभाऊ तुकाराम कानडे यांच्या नावाने दावा मिळकतीचे दि. २८/०९/१९७७ रोजी करुन दिलेले मृत्युपत्र हे नल अँड व्हाईड असलेबाबत कथन करुन वादीने मयताचा व स्वतःचा सही निशाणी अंगठा नाकारला आहे. सदर २८/०९/१९७७ रोजीचे मुळ मृत्युपत्र त्यांनी दाखल केले आहे. प्राप्त परिस्थीतीत मे. न्यायालयासमोर सत्य परिस्थिती येणे न्यायाच्या दृष्टीने गरजेचे व आवश्यक आहे. त्यामुळे, प्रतिवादी क्र. १ च्या नावाने प्रतिवादीच्या लाभात मयत गहिनाजी कोंडाजी चांभार यांनी दि. २८/०९/१९७७ रोजी करुन दिलेल्या मृत्युपत्रावरील वादीचे सही निशाणी अंगठे हे हस्ताक्षर व हस्तरेषा तज्ञ यांचेकडे तपासणीसाठी पाठविणे गरजेचे व आवश्यक आहे. हस्ताक्षर व हस्तरेषा तज्ञ यांचे अहवालामुळे मे. न्यायालयास प्रस्तुत प्रकरणाचा गुणदोषांवर निर्णय देण्यास मदतच होणार आहे. म्हणनु प्रतिवादीने अर्जात नमुद केल्याप्रमाणे हस्ताक्षर व हस्तरेषा तज्ञ यांच्यामार्फत हस्ताक्षर तपासणी होवुन तसा सविस्तर अहवाल मे. नयायालयात दाखल करण्यासंदर्भात आदेश होण्याची विनंती केली आहे.

२. वादी यांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. त्यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, सदर दावा दाखल करुन वादी यांना बरेच वर्षे झाले असुन सदर दाव्याचे कामकाज हे प्रतिवादी यांनी वेळोवळी लांबणीवर टाकले. त्यासाठी अनेकदा त्यांनी मुदती घेतल्या. साक्षीदार यांना समन्स पाठविले. त्यानंतर मे. कोर्टाने प्रतिवादी यांचा पुरावा बंद देखील केला. परंतु, प्रतिवादी यांनी सेट–अ–साईड करुन परत पुरावा देण्याची विनंती केली व पुन्हा कुठलाही साक्षीदार किंवा अन्य लेखी व तोंडी पुरावा दिला नाही. अशाप्रकारे, प्रतिवादी यांनी प्रत्येक वेळी कोर्टाचे व दाव्याचे कामकाज लांबणीवर

टाकण्यासाठी विनाकारण अनेक अर्ज केले व त्यातुन काही निष्पन्न केले नाही. त्यामुळे, सदरचा अर्ज देखील दाव्याचे कामकाज लांबणीवर टाकण्यासाठी दिला असुन वादी यांनी प्रतिवादी यांचा प्रस्तुतचा अर्ज रद्द करण्याची विनंती केली आहे.

३. येथे मला असे नमुद करावे वाटते की, मृत्युपत्र हा दस्त शाबीत करण्यासाठी साक्षांकित करणारा साक्षीदार तपासणे गरजेचे असते. *भारतीय पुरावा अधिनियम १८७२ कलम ६८* – कायदयाने साक्षांकित करणे आवश्यक असलेल्या दस्तऐवजाचे निष्पादन शाबीत करते –

*एखादा दस्तऐवज साक्षांकित करणे कायदयानुसार आवश्यक असल्यास, साक्ष करणारा एखादा जरी साक्षीदार जिवंत असुन न्यायालयाच्या आदेशिकेला अधीन असेल आणि साक्ष देण्यास समर्थ असेल तर, त्या दस्तऐवजाचे निष्पादन झाल्याचे शाबीत करण्यासाठी, त्यावर साक्षांकन करणारा किमान एकतरी साक्षीदार बोलावला गेल्याशिवाय तो दस्तऐवज पुरावा म्हणुन वापरता येणार नाही.*

४. त्यामुळे, वादी जरी मृत्युपत्र हा दस्त नाकारत असला तरी, प्रतिवादी सदरचा दस्त शाबीत करण्यासाठी साक्षांकन करणारा किमान एकतरी साक्षीदार तपासु शकतो. तसेच, जर साक्षांकन करणारा एक देखील साक्षीदार नसेल तर भारतीय पुरावा अधिनियम १८७२ कलम ६९ नुसार तो मृत्युपत्राचा दस्त शाबीत करु शकतात.

५. *भारतीय पुरावा अधिनियम १८७२ कलम ६९* – साक्षांकन करणारा साक्षीदार जर मिळकत नसेल तर शाबिती –

*जर असा कोणताही साक्ष घालणारा उपलब्ध होणे शक्य नसेल, किंवा असा कोणताही दस्तऐवज युनायटेड किंग्डममध्ये निष्पादित झाल्याचे दिसत असेल तर, साक्षांकन करणारा निदान एका साक्षीदाराचे साक्षांकन त्याच्या हस्ताक्षरात आहे आणि दस्तऐवज निष्पादित करणा–या व्यक्तीची स्वाक्षरी त्या व्यक्तीच्या हस्ताक्षरात आहे असे शाबीत केले पाहिजे.*

६. सबब, प्रतिवादीला सदर दस्त शाबीत करण्यासाठी साक्षांकित करणारा साक्षीदार तपासणे किंवा असा साक्षांकन करणारा साक्षीदार मिळत नसेल तर तो दस्तऐवज निष्पादित करणा–या व्यक्तीच्या हस्ताक्षरात आहे हे सिध्द करु शकतो. सबब, भारतीय पुरावा

अधिनियम १८७२ चे कलम ६८ व ६९ चा आधार घेवुन प्रतिवादीचा सदरचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

**१.** प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

**२.** अर्जाचा खर्च अर्जदारावर राहील.

(अर्जाचा निकाल खुल्या न्यायालयात उद्घोषित करण्यात आला.)

दिनांक – २५/१०/२०२३
राहुरी.

**(सौ. आर. एस. तापडीया )**
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
न्यायालय क्र. २, राहुरी.